महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत),
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/ब/किमान वेतन/ No 22596 दिनांक : 13 AUG 2019

## परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना सुधारीत दराने मूळ किमान वेतन आणि विशेष भत्ता दर अदा करणेबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/३६६९० दि. ०४/१२/२०१०.

**************

महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना मूळ किमान वेतन आणि विशेष भत्ता दर देण्याबाबत सांघिक कार्यालयाकडून वेळोवेळी विविध परिपत्रकांद्वारे निर्देशित करण्यात आलेले आहेत.

शासनाचे उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. २४ जुलै २०१९ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनानूसार मुंबई दुकाने व आस्थापना उद्योगातील अनुसुचि करीता किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांचे किमान वेतनाचे दर दि. २४/०७/२०१९ पासून पुनर्निधारित केले आहे. त्यानुसार, महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना सुधारीत दराने मूळ किमान वेतन आणि विशेष भत्ता दर अदा करणे कायद्यान्वये बंधनकारक आहे.

**सुधारीत किमान वेतनाचे दर खालीलप्रमाणे आहेत. ( दि. २४/०७/२०१९ पासून )**

| अ.क्र. | कामगारांची वर्गवारी | मूळ किमान वेतन (दरमहा रुपये) | | |
|---|---|---|---|---|
| | | * परिमंडळ- १ | * परिमंडळ - २ | * परिमंडळ - ३ |
| (१) | (२) | (३) | | |
| १. | कुशल | ११,६३२/- | ११,०३६/- | १०,४४०/- |
| २. | अर्धकुशल | १०,८५६/- | १०,२६०/- | ९,६६४/- |
| ३. | अकुशल | १०,०२१/- | ९,४२५/- | ८,८२८/- |

*स्पष्टीकरण :- या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ.

(अ) परिमंडळ -१ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका हद्दीतील सर्व क्षेत्र तसेच महानगरपालिका क्षेत्रापासून २० किलोमीटर पर्यंतचे औद्योगिक क्षेत्र / छावणी क्षेत्रांचे मिळून होईल.

(ब) परिमंडळ -२ - महाराष्ट्र शासनाच्या सर्व वर्ग नगरपरिषदा क्षेत्रांचे मिळून होईल.

(क) परिमंडळ -३ - परिमंडळ एक व परिमंडळ दोन वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्रांचे मिळून होईल.



Scanned by CamScanner

तसेच कामगार उपायुक्त (ग्रा.वि. आणि अं) व सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम- १९४८, मुंबई यांनी दि. ०५/०८/२०१९ च्या आदेशान्वये दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरिता प्रतिमहिना परिमंडळनिहाय **विशेष भत्त्याचे दर दि. ०१/०७/२०१९ ते ३१/१२/२०१९ या कालावधीकरिता** खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत.

**सुधारीत विशेष भत्त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.**

| अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - ३ |
|---|---|---|---|
| दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग (दि. ०१/०७/२०१९ ते २३/०७/२०१९) | ४,४८२/- | ४,४८२/- | ४,४८२/- |
| (दि. २४/०७/२०१९ ते ३१/१२/२०१९) | ३९०/- | ३९०/- | ३९०/- |

क्षेत्रिय कार्यालयांना याद्वारे निर्देशित करण्यात येते की, कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना वरीलप्रमाणे सुधारीत मूळ किमान वेतन आणि विशेष भत्ता दर अदा करणे कायद्यान्वये ठेकेदारावर बंधनकारक असून त्याची काटेकोरपणे अमलबजावणी करण्याच्या दृष्टीने वेळोवेळी शासनामार्फत मूळ किमान वेतन आणि विशेष भत्त्याच्या दरामध्ये वाढ झाल्यास त्याप्रमाणे सदर दरवाढ लागू झाल्याच्या तारखेपासून मूळ किमान वेतनाचे आणि विशेष भत्त्याचे दर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना ठेकेदारामार्फत देण्यात आले असल्याची खातरजमा करण्यात यावी.

सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal वरील Circular (I.R. Department) येथे उपलब्ध असून त्यांची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(चंद्रशेखर येरमे)
**कार्यकारी संचालक (मासं)**

प्रत :
प्रेषण यादी प्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.



Scanned by CamScanner